# प्रसिद्धी पत्रक

**विषय : महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (आयोग), मुंबई लहान आणि मोठ्या वातानूकुलित उपकरणांमध्ये ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा वापरायची वेळ यामध्ये बद्दल करण्यासाठी दिनांक १८.१२.२००९ रोजी बांद्रे येथे घेण्यात आलेल्या कार्यशाळेची माहिती**

लहान आणि मोठ्या इमारतीमधल्या वातानूकुलित यंत्राचा दिवसा सर्वात जास्त प्रमाणात वापर केला जातो. मुंबई आणि ठाणे या सारख्या शहरांमधील वाणिज्यिक, औद्योगिक, सरकारी आणि निवासी इमारतींमध्ये वातानूकुलित यंत्राचा सर्वात जास्त प्रमाणात वापर केला जातो. आयोगाने अशा वापराबद्दल चर्चा करण्यासाठी दिनांक १८.१२.२००९ रोजी नॅशनल स्टॉक एक्सचेंज, बांद्रे-कुर्ला-संकुल, बांद्रे, येथे एक दिवसाची कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेचे प्रयोजन या क्षेत्रामधील तांत्रिक उपाय आणि उपलब्ध पर्यायांची अंमलबजावणी करण्यात येणा-या अडचणींवर सविस्तार चर्चा करणे, असे होते. सुमारे १५० तज्ज्ञ तांत्रिक आणि ग्राहक या कार्यशाळेमध्ये सहभागी झाले होते. मुंबई व ठाणे शहर आणि उपनगरांमधील चार विद्युत वितरण कंपन्याचे मोठे व लहान ग्राहक, यांनी देखील या कार्यशाळेमध्ये सक्रीय सहभाग घेतला होता. तसेच, मोठी इस्पितळे, शॉपिंग मॉल्स, बॅंकाची कार्यालये, महानगरपालिका, इतर औद्योगिक व सेवा क्षेत्रातल्या तांत्रिक अधिका-यांनी या कार्यशाळेमध्ये सक्रीय सहभाग घेतला. या कार्यशाळेमध्ये वातानूकुलित यंत्रे दुपारच्या ऐवजी रात्री, जेव्हा वीज वापरावरील आकारणी कमी असते तेव्हा कशी वापरता येतील याबद्दल चर्चा झाली. याच बरोबर घरगुती उपकरणातील पंखे, फ्रीज आणि वातानूकुलित यंत्रांमधील ऊर्जा संवर्धनाबद्दल देखील चर्चा करण्यात आली. व्यवसायिक कार्यालये व सौर ऊर्जेवर चालणा-या वातानूकुलित यंत्रामधील नाविन्यता या विषयांवर विशेष चर्चा झाली.

आयोगाचे अध्यक्ष श्री. व्ही. पी. राजासाहेब यांच्या मुख्य भाषणाचा आणि दिवस अखेरच्या उच्च-स्तरीय तज्ज्ञांच्या पॅनलमधील चर्चेचा फायदा जमलेल्या ग्राहकांना झाला. यापुढे या क्षेत्रामध्ये सुधारणा करण्याचे योग्य उपाय यावर चर्चा करण्यात आली. आयोग, विद्युत वितरण कंपन्यांना त्यांच्या ग्राहकांना सोबत घेऊन कमाल मागणीच्या (peak hour) कालावधीत वीजेचा वापर कमीत कमी करणे, या संदर्भात निर्देश करेल. राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन ब्युरोने ठरविलेल्या स्टार लेबलिंग केलेल्या घरगुती उपकरणांचा प्रचार करण्याबाबतही आयोग या पुढे विद्युत वितरण कंपन्यांना प्रचलित करेल. राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन ब्युरोने ठरविलेल्या ऊर्जा संवर्धन इमारतीची मानके (ECBC) यांचा प्रचार सुद्धा महापालिकांना सोबत घेऊन या पुढे करण्यात येईल. याचा फायदा महापालिकेच्या ग्राहकांना देखील होऊन राज्यात ऊर्जा संवर्धनाच्या कार्याला चालना मिळेल.